# मत्स्यव्यवसाय विभाग

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

मत्स्यव्यवसाय विभाग

# नागरिकांची सनद

## आयुक्त मत्स्यव्यवसाय,

## महाराष्ट्र राज्य, मुंबई

# मनोगत

मत्स्यव्यवसायाचे खरे लाभार्थी आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेला परंपरागत मच्छिमार आहे. शैक्षणिक स्तर उंचावल्यामुळे योजनांची माहिती करून घेण्याची व त्यापासून लाभ मिळविण्याची प्रवृत्ती वाढली आहे. ग्रामीण भागात मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते.

"नागरिकांची सनद" या पुस्तिकेत मत्स्यव्यवसाय विभागाच्या निरनिराळ्या योजना व आर्थिक अनुदानाच्या सवलतींची माहिती देण्यात आली आहे. या पुस्तिकेमुळे सामान्य मच्छिमार तसेच मच्छिमार सहकारी संस्था, मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजनेचे लाभ सहजतेने घेऊ शकतील अशी मला आशा आहे.

दिनांक : ३०/१२/२०२५

-स्वाक्षरीत-

(किशोर तावडे भा.प्र.से.)
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## अनुक्रमणिका


| अ.क्र | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | मासेमार नौकांचे ऑनलाईन पध्दतीने नोंदणी | ३ |
| २ | हायस्पीड डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपूर्तीबाबत | ४ |
| ३ | मच्छिमार नौकांसाठी ऑनलाईन पध्दतीने मासेमारी परवाना | ५ |
| ४ | नैसर्गिक आपत्तीत मृत मच्छिमांराच्या वारसांना सहाय्यक अनुदान | ६ |
| ५ | मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसाहाय्य (सागरी) | ७ |
| ६ | मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसाहाय्य (भूजल) | ८-९ |
| ७ | मच्छिमारांसाठी मासेमारी परवाना | १० |
| ८ | ऑनलाईन पध्दतीने निमखारे पाणी मत्स्य / कोळंबी संवर्धन प्रकल्प नोंदणी व नुतनीकरण करणे | ११-१२ |
| ९ | मच्छिमार संस्थाची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी | १३ |
| १० | प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेतंर्गत कार्यरत मच्छिमारांसाठी अपघात गट विमा योजना | १४-१५ |
| ११ | मासेमारी बंदी कालावधी दरम्यान मच्छिमारांना उदरनिर्वाहाकरिता अर्थसहाय्य (क्रियाशील मच्छिमारांकरिता राष्ट्रीय कल्याणकारी बचतीसह मदतीची योजना) 2 | १६-१७ |

**सेवेचे नाव : मासेमार नौकांचे ऑनलाईन पध्दतीने नोंदणी**

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा संक्षिप्त तपशील | मासेमार नौकांचे ऑनलाईन पध्दतीने नोंदणी |
| २ | आवश्यक कागदपत्रे (यादी) | परवाना अधिकाऱ्याचे पत्र, नौका तपासणी अहवाल, नौका मालकाचा विहीत नमुन्यातील अर्ज, Application Form-I, NIC Input Format, Declaration, भागीदार करारपत्र, नौका खरेदी / बांधकाम करारनामा, नौकेचा कलरकोडसह फोटो (परवाना अधिकारी यांच्या सही व शिक्क्यासह), इंजिन खरेदी पावती / प्रतिज्ञापत्र, इंजिन व इंजिन नंबरचा फोटो (परवाना अधिकारी यांच्या सही व शिक्क्यासह), नौका मालकाचे पासपोर्ट फोटो - प्रत्येकी ४, आधारकार्ड (स्वयंसाक्षांकित प्रत) / बायोमेट्रीक कार्ड, रेशनकार्ड / लाईट बील, रहिवासी दाखला, मच्छिमार संस्थेचा दाखला, जिवनरक्षक साधने खरेदी पावती, अग्निरोधक साधने खरेदी पावती, दळणवळण साधने- वायरलेस, जीपीएस, डॅट, रेडीओ इ. यंत्रसामुग्री फोटो |
| ३ | ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | आपले सरकार |
| ४ | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | यांत्रिकी नौका- रु.१०/<br>बिगर यांत्रिक नौका-रु.५/- |
| ५ | शुल्क भरण्याची पध्दत | ऑनलाईन /ऑफलाईन |
| ६ | मंजूरीसाठी लागणारा कालावधी | ६०दिवस |
| ७ | मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, पालघर/ठाणे/ मुंबई शहर/मुंबई उपनगर/रायगड/रत्नागि री/ सिंधुदूर्ग |
| ८ | सेवेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अपिलीय अधिकारी | प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई दुसरा मजला, प्रशासकीय इमारत, शासकीय वसाहत, वांद्रे (पू)-मुंबई-५१.<br>०२२-२६५५३२७९ |

**योजनेचे नाव :** हायस्पीड डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपूर्तीबाबत

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा संक्षिप्त तपशील | हायस्पीड डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपूर्तीबाबत |
| २ | योजनेच्या पात्रतेचे निकष | विधिग्राहय मासेमारी परवाना, संस्थेचा कायम सभासद |
| ३ | आवश्यक कागदपत्रे (यादी) | VRC परवाना,विमा, संस्थेचा दाखला,विहित नमुन्यातील अर्ज, खलाशांचे आधारकार्ड/बायो मेट्रिक कार्ड |
| ४ | ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | सदयस्थितीत ऑनलाईन सुविधा नसल्याने ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यात येते. |
| ५ | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | --- |
| ६ | शुल्क भरण्याची पध्दत | --- |
| ७ | मंजूरीसाठी लागणारा कालावधी | ३० दिवस |
| ८ | मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | आयुक्त मत्स्यव्यवसाय,मुंबई |
| ९ | सेवेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अपिलीय अधिकारी | आयुक्त मत्स्यव्यवसाय,मुंबई. |

**सेवेचे नाव:- मच्छिमार नौकांसाठी ऑनलाईन पध्दतीने मासेमारी परवाना (सागरी)**

| | | |
|---|---|---|
| 1 | सेवेचा संक्षिप्त तपशील | मच्छिमार नौकांसाठी ऑनलाईन पध्दतीने मासेमारी परवाना |
| २ | आवश्यक कागदपत्रे (यादी) | मासेमारी परवाना अर्ज, मुळ मासेमारी परवान, VRC/कौलची झेरॉक्स, नमुना ५ ची झेरॉक्स, आधारकार्ड QR कोड ची झेरॉक्स/खलाशी सहत इंजिन नंबरचा फोटो कलर कोड सहीत तिन्ही बाजूने बोटीचा फोटो, बोटीचा नंबर लाईफ जॅकेट ची पावती, अग्निशामक साधानांची पावती, बोट व खलाश्यांचा विमा, नौका मालकाचा पासपोर्ट साईज फोटो |
| ३ | ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | आपले सरकार |
| ४ | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | यांत्रिकी नौका- (५० एच पी च्या वरील) रु.५००/<br>यांत्रिकी नौका- (५० एच पी च्या खालील) रु.२००/-<br>बिगर यांत्रिक नौका (३ टनापेक्षा जास्त) रु.१००/-<br>बिगर यांत्रिक नौका (३ टनापेक्षा कमी) रु.५०/- |
| ५ | शुल्क भरण्याची पध्दत | ऑनलाईन /ऑफलाईन |
| ६ | मंजूरीसाठी लागणारा कालावधी | ४५ दिवस |
| ७ | मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी तथा परवाना अधिकारी, (संबंधित सागरी तालुका) |
| ८ | सेवेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अपिलीय अधिकारी | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, पालघर/ठाणे/ मुंबई शहर/मुंबई उपनगर/रायगड/रत्नागिरी/ सिंधुदूर्ग |

**सेवेचे नाव :- नैसर्गिक आपत्तीत मृत मच्छिमारांच्या वारसांना सहाय्यक अनुदान**

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा संक्षिप्त तपशील | नैसर्गिक आपत्तीत मृत मच्छिमारांच्या वारसांना सहाय्यक अनुदान |
| २ | योजनेचा पात्रतेचे निकष | मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचे क्रियाशील मच्छिमार असणे आवश्यक, तसेच मच्छिमार हा मासेमारी करताना मृत्यू पावल्यास त्यांच्या वारसांना रु.१.०० लक्ष इतके अनुदान देण्यात येते. |
| ३ | आवश्यक कागदपत्रे (यादी) | विहित नमुन्यातील अर्ज, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचे क्रियाशील मच्छिमार असल्याचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीचे सरपंच/पोलीस पाटील यांचे मृत मच्छिमारांबाबत मृत्यू तसेच वारस प्रमाणपत्र, जन्म-मृत्यू दाखला, पोलीस पंचनामा, शवविच्छेदन अहवाल (PM report) |
| ४ | ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | सदयस्थितीत ऑनलाईन सुविधा नसल्याने ऑफलाईन अर्ज स्विकारण्यात येते. |
| ५ | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | -- |
| ६ | शुल्क भरण्याची पध्दत | -- |
| ७ | मंजूरीसाठी लागणारा कालावधी | शासनाकडून निधी प्राप्त होताच आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या मान्यतेने संबंधि तांच्या वारसांना रु.१.०० लक्ष इतके अनुदान करण्यात येते. |
| ८ | मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| ९ | सेवेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अपिलीय अधिकारी | आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई., प्रादेशिक मत्स्यव्यवसाय तसेच संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) |

## योजनेचे नाव - मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसहाय्य (सागरी)

| | | |
|---|---|---|
| १ | विषयाचा संक्षिप्त तपशिल | **मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसहाय्य** |
| २ | आवश्यक कागदपत्रे | **१.तयार मासेमारी जाळी खरेदीवर अनुदान**-बोटीचा VRC, नमुना ५, परवाना, विमा, संस्थेचा दाखला/शिफारसपत्र, जाळयांचे कोटेशन, बँकपासबुक, विहीत नमुन्यातील अर्ज, खलाश्यांचे आधारकार्ड/बायोमेट्रीक कार्ड, रेशनकार्ड<br>**२.बिगर यांत्रिक नौका**-रापणकार संघाचा सभासद, संघाचे प्रमाणपत्र, नौका बांधणीचे दरपत्रक, कुटुंबाचा तपशील, योजनेतील अटी शर्तीचे प्रतिज्ञापत्र |
| ३ | आवश्यक शुल्क | -- |
| ४ | शुल्क/फि भरण्याची पध्दत | -- |
| ५ | प्रक्रिया पुर्ण करण्यास लागणारा कालावधी | ३० दिवस |
| ६ | कार्यपध्दतीविषयी सविस्तर माहिती मिळण्याचे ठिकाण | १. प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग, मुंबई<br>२.संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय |
| ७ | कोणत्या अधिनियमाचे/नियमाचे आधारे सदर काम केले जाते | शासन पत्र क्र.मत्स्यवि-११२२/प्र.क्र.२२९/पदुम १४ दि.९ फेब्रुवारी २०२३ |
| ८ | संबंधित शासन निर्णय, आदेश,परिपत्रक इ. | शासन पत्र क्र.मत्स्यवि-११२२/प्र.क्र.२२९/पदुम १४ दि.९ फेब्रुवारी २०२३ |
| ९ | निर्णय घेणारे अधिकारी | संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय |
| १० | प्रक्रिया विहीत कालावधीमध्ये न केल्यास त्याबाबतची कारणे लेखी स्वरुपात देण्यास जबाबदार अधिकारी | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग, मुंबई |
| ११ | या प्रक्रियेबाबत ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी त्या कार्यालयाचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग, मुंबई |
| १२ | प्रक्रिया करण्यास नाकारल्यास त्याचे आदेशाविरुध्द कोणत्या तरतुदीनुसार कोणत्या प्राधिकरणाकडे अपील करता येईल | आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई |

**योजनेचे नाव- मासेमारी साधनावर अर्थसहाय्य (भूजल)**

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा संक्षिप्त तपशील/योजनेचे नाव | मासेमारी साधनावर अर्थसहाय्य |
| २ | योजनेचे पात्रतेचे निकष | १. लाभार्थी हा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचा सभासद अथवा वैयक्तिक क्रियाशिल मच्छिमार असावा.<br>२. मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाना त्यांच्या सभासदांकरिता अनुदान देय असलेले जाळे संघ अन्य/संस्था/जाळी विक्रेत्याकडून खरेदी करण्याची मुभा राहिल. परंतु खरेदी केलेले जाळी यांचा विहित पंचनामा संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांनी केल्यानंतर व तो पंचनामा सहाय्यक आयुक्त यांनी ग्राहय धरल्यानंतर ५० % अनुदान अनुज्ञेय राहील.<br>३. जाळी खरेदी स्थानिक मासेमार सहकारी संस्था अथवा जिल्हा मच्छिमार सहकारी संघाकडून अथवा जाळी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्याकडून करावी. लाभार्थी संस्थेचा सभासद असल्यास सदर जाळी खरेदीच्या जी.एस.टी. सह पावत्या संबंधीत संस्था/संघाच्या शिफारशीसह मत्स्यव्यवसाय कार्यालयाकडे अनुदान मंजूरीसाठी सादर कराव्यात.<br>४. जाळी खरेदीच्या जी.एस.टी. सह पावत्या खरेदीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आंत जिल्हा कार्यालयास सादर कराव्यात.<br>५. क्रियाशिल मच्छीमारास एका वर्षामध्ये अनुज्ञेय कमाल मर्यादेत अनुदान देय राहिल. एकच व्यक्ति एकाहून अधिक संघातून/संस्थेतून लाभ घेणार नाही हे पहावयाची जबाबदारी संबंधित सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची राहील.<br>६. रांपणसंघानी आपल्या संघाचे नांव त्या संघातील सदस्यांची नांवे व त्यांचे संपूर्ण पत्ते, दुरध्वनी क्र., भ्रमणध्वनी क्र. दरवर्षी एप्रिल महिन्यात संबंधित जिल्हयातील सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना कळविण्यात यावीत. मत्स्यव्यवसाय विभागाच्या जिल्हा कार्यालयात नोंद झालेल्या संघाना /संस्थांना या योजनेचा फायदा मिळेल. संघातील/संस्थेतील सदस्यांच्या नावात /संख्येत बदल झाल्यास तो बदल झाल्यापासून एक महिन्यात जिल्हा कार्यालयाला कळवावा, मात्र कोणत्याही परिस्थितीत त्या वर्षाच्या सुरवातीस कळविलेल्या सभासद संख्येच्या मर्यादेपर्यंतच त्यावर्षी अनुदान देण्यात येईल. रांपण संघ/संस्थातील सभासद संख्या, त्यात झालेला बदल याबाबत उपरोक्त अर्थसहाय्याबाबतचा निर्णय सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय देतील<br>७. मच्छिमारांनी नौकेसाठी आवश्यक मासेमारी परवाना, नौका नोंदणी प्रमाणपत्र, विमापत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.<br>८. अर्जदारांनी पुर्वी यांत्रिकी नौकांसाठी अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा, असल्यास त्याच्या हिस्श्याची अनुदानाची रक्कम परत करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | ९. अर्जदाराने मत्स्यव्यवसाय विभागाकडुन घेतलेले सर्व कर्ज व्याजासह चुकते केलेले असावे.<br>१०. अनुदान प्राप्त बिगर यांत्रिक नौका अनुदान दिल्यापासून ७ वर्षांच्या कालावधीत हस्तांतरीत अथवा विकता येणार नाहीत.<br>११. अनुदानाच्या मर्यादेत मच्छीमारांनी बांधलेल्या / विकत घेतलेल्या नौकेचे यांत्रिकीकरण करावयाचे झाल्यास त्यासाठी शासनाची परवानगी असेल.<br>१२. भूजल क्षेत्रातील लहान होड्यांची संबंधित जिल्हा कार्यालयातर्फे नोंदणी करण्यात येईल व तसे अभिलेख कार्यालय ठेवतील.<br>१३. नोंदणी क्रमांक सदरहू नौकेवर लिहिल्यानंतर अनुदान अनुज्ञेय राहील.<br>१४. नौकेचा आयुर्मान कालावधी पूर्ण झाल्यानंतर लाभार्थी नवीन नौकेसाठी प्रस्ताव सादर करण्यास पात्र राहील.<br>१५. नौकेवर खलाशांच्या संख्येनुसार जीवरक्षक साधने उपलब्ध असणे आवश्यक आहे. |
| ३ | आवश्यक कागदपत्रे | १. अर्जाची प्रत<br>२. संस्थेचा सभासद व मच्छीमार असल्यासंबंधीचा संस्थेचा दाखला<br>३. नौका बांधणीचा करारनामा<br>४. जाळी व बोटी खरेदी केल्याचा विहीत पंचनामा<br>५. शीड, वल्ही,नांगर,दोर,जाळी यांच्या जी.एस.टी नमुद असलेल्या पावत्या<br>६. लाभार्थी संस्थेचा सभासद असल्यास जाळी खरेदीच्या जी.एस.टी सह पावत्या संबंधित संस्था/संघाच्या शिफारशीसह |
| ४ | ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | नाही |
| ५ | आवश्यक शुल्क (लागु असल्यास) | नाही |
| ६ | शुल्क भरण्याची पध्दत | - |
| ७ | मंजुरीसाठी लागणारा कालावधी | - |
| ८ | मंजुर करणारे सक्षम प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय संबंधित जिल्हा |
| ९ | सेवेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अपिलिय अधिकारी | - |

**सेवेचे नाव :- मच्छिमारांसाठी मासेमारी परवाना**

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा संक्षिप्त तपशील | मच्छिमारांसाठी मासेमारी परवाना |
| २ | आवश्यक कागदपत्रे (यादी) | १.आधार कार्ड<br>२.मतदान कार्ड<br>३.रहिवासी दाखला |
| ३ | ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | आपले सरकार |
| ४ | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | तळी व तलावातील मासेमारी रु.५००/- प्रति महिना |
| ५ | शुल्क भरण्याची पध्दत | ऑनलाईन/ऑफलाईन |
| ६ | मंजूरीसाठी लागणारा कालावधी | ३०दिवस |
| ७ | मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (सर्व जिल्हे) |
| ८ | सेवेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अपिलीय अधिकारी | प्रादे शिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय,<br>मुंबई/पुणे /नाशिक / छत्रपती संभाजीनगर /<br>अमरावती / लातूर /नागपूर |

**सेवेचे नाव :- ऑनलाईन पध्दतीने निमखारे पाणी मत्स्य/कोळंबी संवर्धन प्रकल्प नोंदणी व नुतनीकरण करणे**

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा संक्षिप्त तपशील | ऑनलाईन पध्दतीने निमखारे पाणी मत्स्य/कोळंबी संवर्धन व वीज उत्पादन केंद्र |
| २ | आवश्यक कागदपत्रे (यादी) | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. नोंदणी शुल्क भरण्याचा पुरावा (इलेक्ट्रॉनिक पेमेंट पुरावा) ज्यामध्ये युनिक ट्रान्झॅक्शन रेफरन्स नंबरचा समावेश आहे.<br>३.जागेच्या नोंदणीकृत विक्री कराराची/भाडेपटटा करारारची प्रत/सरकारने नियुक्त केलेल्या वॅलोटनसेंट दस्तऐवजाचा पुरावा/ स्थानिक भाषेत आणि स्व-प्रमाणासह भाषांतरीत इंग्रजी आवृत्ती.<br>४. भागीदारी करार, लागू असल्यास<br>५.कंपनी/फर्म नोंदणी प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>६.जागेच्या फील्ड मेजरमेंट बुक स्केचची प्रत<br>७. शेताचा आराखडा (५ हेक्टरपेक्षा जास्त जलक्षेत्र असलेल्या मत्स्य/कोळंबी प्रकल्पासाठी आणि २० पेक्षा जास्त साठवण घनता असलेल्या विदेशी प्रजातींच्या मत्स्य/कोळंबी प्रकल्पासाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्राचा आराखडा योग्यरित्या दर्शवितो. जलक्षेत्राची व्याप्ती काहीही असो, प्रति मीटर २ मध्ये पोस्ट लावा)<br>८. सक्षम अधिकाऱ्याने मंजूर केलेल्या मूल्यांकन अहवाल (१० हेक्टरपेक्षा जास्त जल क्षेत्रावरील शेतात/ मॅरीकल्चर युनिटसाठी अनिवार्य )<br>९. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन अहवाल (१० हेक्टरपेक्षा जास्त जलक्षेत्रावरील शेतात/मॅरीकल्चर युनिटसाठी अनिवार्य)<br>१० पर्यावरण व्यवस्थापन योजन अहवाल (वरील शेतात/मॅरीकल्चर युनिटसाठी अनिवार्य)<br>११ स्थानिक प्रशासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र<br>१२ प्रकल्प अहवाल,लागू असल्यास<br>१३ तटीय जलकृषि प्राधि करण केंद्र/ ए क्टिविटी नोंदणीच्या नूतनीकरणासाठी अर्ज सादर करण्यास झालेल्या विलंबाबद्दल माफीची घोषणा (लागू असल्यास)<br>१४ इतर कोणतेही कागदपत्र (कृपया निर्दिष्ट करा) |
| ३ | ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | आपले सरकार |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | ५.० हेक्टरपर्यंत जलक्षेत्र | दोनशे रुपये(किंवा हेक्टरचा काही भाग)किमान पाचशे रुपये |
| | | ५.० हेक्टर ते १० हेक्टर पर्यंत जलक्षेत्र | एक हजार रुपये आणि पाच हेक्टरपेक्षा जास्त असल्यास आणि प्रति हेक्टर पाचशे रुपये (किंवा हेक्टरचा अंश ) |
| | | १० हेक्टर पर्यंत जलक्षेत्र | तीन हजार रुपये आणि दहा हेक्टरपेक्षा जास्त प्रति हेक्टर (किंवा हेक्टरचा काही भाग) एक हजार रुपये |
| | | मत्स्य कोळंबी बीज उत्पादन केंद्र, मत्स्य/कोळंबी बीज संगोपन केंद्र, जिवंत मत्स्य/कोळंबी खाद्य केंद्र | नोंदणी शुल्क दहा हजार मात्र |
| | | | प्राधिकरणाने निर्दिष्ट केल्यानुसार पन्नास हजार रुपये देखरेख शुल्क आणि कामगिरी हमी |
| | | बुडस्टॅक मल्टिप्लिकेशन केंद्र व न्युक्लिअर ब्रिडिंग केंद्र | नोंदणी शुल्क वीस हजार मात्र |
| | | | आजारातून बरे होण्याकरीता देखरेख शुल्क आणि प्राधिकरणाने निर्दिष्ट केल्यानुसार कामगिरी हमी |
| | | समुद्री शैवाळ संवर्धन | शंभर रुपये प्रति नोंदणी |
| | | पेनकल्चर, राफ्टकल्चर, आणि केजकल्चर | प्रति घनफुट दोनशे मात्र किमान दोनशे रुपये मात्र |
| | | घरातील किंवा बाहेरील सिमेंट टाक्यांमधील रिसर्कुलेटरी ॲक्वाकल्चर सिस्टिम बायोफ्लॉक सिस्टिम | |
| ५ | शुल्क भरण्याची पध्दत | ऑनलाईन/ऑफलाईन | |
| ६ | मंजूरीसाठी लागणारा कालावधी | ३०दिवस | |
| ७ | मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | तटीय जलकृषि प्राधि करण, चेन्नई | |
| ८ | सेवेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अपिलीय अधिकारी | सह- आयुक्त मत्स्यव्यवसाय (निपास), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | |

**सेवेचे नाव :- मच्छिमार संस्थाची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी**

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा संक्षिप्त तपशील | मच्छिमार संस्थाची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी |
| २ | आवश्यक कागदपत्रे (यादी) | शासनाचे दि.०३/०७/२०१९ व दि.८/३/२०२३चे परिपत्रक |
| ३ | ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | http://aaplesarkar.mahaonlive.gov.in/en |
| ४ | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलममधील तरतुदीनुसार नोंदणी फी |
| ५ | शुल्क भरण्याची पध्दत | ऑनलाईन/ऑफलाईन |
| ६ | मंजूरीसाठी लागणारा कालावधी | ६०दिवस |
| ७ | मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मत्स्यव्यवसाय (सर्वजिल्हे) |
| ८ | सेवेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अपिलीय अधिकारी | उपनिबंधक, आयुक्त मत्स्यव्यवसाय, कार्यालय, मुंबई. |

**योजनेचे नाव - प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेतंर्गत कार्यरत मच्छिमारांसाठी अपघात गट विमा योजना**

| | | |
|---|---|---|
| 1 | योजनेचा संक्षिप्त तपशिल | प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेतंर्गत कार्यरत मच्छिमारांसाठी अपघात गट विमा योजना |
| 2 | योजनेच्या पात्रतेचे निकष | सदर योजनेत केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत केंद्र शासनाने अपघात गट विमा योजनेसाठी पुर्वीच्या रू.2.00 लक्ष ऐवजी आता रू.5.00 लक्ष इतके अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे व अंशतः अंपगत्व आल्यास रू.1.00 लक्ष ऐवजी रु.2.50 लक्ष इतके विमा संरक्षण देण्यात येणार आहे.<br>• या व्यतिरिक्त मच्छिमारांना रु.25,000/-पर्यंत वैद्यकीय उपचारार्थ खर्च भागविण्यासाठी स्पेशल कॉंटिजन्सी पॉलिसी हि योजना कार्यान्वित करण्यात येते. |
| 3 | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | (1) मूळ दावा माहिती फॉर्म (दावा फॉर्म) (2) मूळ विमा दावा फॉर्म विमाधारक/दावेदाराने रितसर भरलेला आणि स्वाक्षरी (3) प्रथम माहिती अहवालाची (एफआयआर) प्रमाणित प्रत. (4) पंचनाम्याची प्रमाणित प्रत (स्पॉट पंचनामा/चौकशी पंचनामा) (5) शवविच्छेदन अहवालाची प्रमाणित प्रत (PME) (6) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.) यांचे प्रमाणित पत्र आणि राज्य (7) मूळ मृत्यू प्रमाणपत्र (8) मूळ कुटुंब सदस्य प्रमाणपत्र (कायदेशीर वारस प्रमाणपत्र) (9) वर्तमानपत्राच्या क्लिपिंग्ज, जर असतील तर (10) रुग्णालयातील वैद्यकीय अहवाल/मृत्यूचा संक्षिप्त अहवाल. (11) संबंधित बँक अधिकाऱ्याने रितसर स्वसक्षरी केलेला नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (NEFT) बँक खाते फॉर्म.<br>(12) दावेदाराने स्वाक्षरी केलेले डिस्चार्ज व्हाउचर रु.1/- च्या चिकटलेल्या पावती स्टॅम्पसह. (13) बुडण्याच्या प्रकरणात दोन साक्षीदारांचे जबाब. (14) बुडणे किंवा विषारी पदार्थ हाताळण्याच्या विशिष्ट प्रकरणांमधील निष्कर्षासह FSL (फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी) अहवाल/रासायनिक विश्लेषण अहवाल (15) वैध ड्रायव्हिंग लायसन्स (विमाधारक वाहन चालवत असताना रस्ता अपघात झाल्यास. (16) पोलीस अधिकाऱ्यांकडून अंतिम तपास अहवाल (FIR). (17) निवासी पत्ता पुरावा म्हणून आधार कार्ड प्रत/मतदार ओळखपत्र प्रत/रेशन कार्ड (18) नामनिर्देशित व्यक्तीचे पॅन कार्ड (19) मच्छीमार सहकारी संस्था सदस्यत्व प्रमाणपत्र/ मासेमारी परवाना. (20) प्रतिज्ञापत्र/ना हरकत प्रमाणपत्र (कुटुंबातील एकापेक्षा जास्त सदस्यांच्या बाबतीत) (21) गहाळ प्रकरणांसाठी नुकसान भरपाई बाँड. (22) बुडणे आणि इतर विशिष्ट प्रकरणांचा पुरावा. |
| 4 | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | ऑनलाईन पध्दतीने मूळ दावा विमा कंपनीस सादर करण्यात येतो. |

| | | |
|---|---|---|
| 5 | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | सदर योजनेत केंद्र शासन व राज्य शासनाकडून प्रत्येकी 60% व 40% प्रमाणे रक्कम भरण्यात येते. यामध्ये लाभार्थ्यांना विमा रक्कम भरण्याची आवश्यकता नाही. |
| 6 | शुल्क भरण्याची पद्धत | - |
| 7 | योजना मंजूरीसाठी लागणारा कालावधी | अपघाताच्या तारखेपासून 120 दिवसांच्या आत दावा विमा कंपनीला कळविला जाणे आवश्यक आहे.<br>* अपघाताच्या तारखेपासून 180 दिवसांच्या आत दाव्याची कागदपत्रे विमा कंपनीकडे सादर करणे आवश्यक आहे.<br>विमा सेल दाव्याची माहिती विमा कंपनीला 3 कामकाजाच्या दिवसांत सामायिक<br>करेल. राज्य/ जिल्हा मत्स्यव्यवसाय अधिकारी प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्याची माहिती 7 कामकाजाच्या दिवसांत विमा कक्षाकडे पाठवतील अभिलेख्यांची योग्य पडताळणी केल्यानंतर 7 कामकाजाच्या दिवसांत राज्य/ सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (ता.) यांच्या पत्रासह मूळ दाव्याची कागदपत्रे कक्षास पाठवून, MIS द्वारे अपलोड केली जातात आणि त्यानंतर सर्व कागदपत्रे पोस्टाने किंवा वैयक्तिकरित्या पाठविली जातात. सर्व संबंधित कागदपत्रे मिळाल्यानंतर M/s OICL 15 कामकाजाच्या दिवसात दावा निकाली काढले जातात. |
| 8 | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | राष्ट्रीय मत्स्यकि विकास बोर्ड, हैद्राबाद (विमा सेल) |
| 9 | योजनेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई व प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय तसेच संबंधीत जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), |

**योजनेचे नाव -मासेमारी बंदी कालावधी दरम्यान मच्छिमारांना उदरनिर्वाहाकरिता अर्थसहाय्य**

**(क्रियाशील मच्छिमारांकरिता राष्ट्रीय कल्याणकारी बचतीसह मदतीची योजना)**

| | | |
|---|---|---|
| 1 | योजनेचा संक्षिप्त तपशिल | मासेमारी बंदी कालावधी दरम्यान मच्छिमारांना उदरनिर्वाहाकरिता अर्थसहाय्य (क्रियाशील मच्छिमारांकरिता राष्ट्रीय कल्याणकारी बचतीसह मदतीची योजना) |
| 2 | योजनेच्या पात्रतेचे निकष | (i) लाभार्थी पूर्णवेळ क्रियाशील मासेमारी करणारा असावा. (ii) लाभार्थी हा कार्यशील स्थानिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था/संघटना/ इतर कोणत्याही नोंदणीकृत संस्था/संघटना सदस्य असावा. (iii) लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) असावा व त्याचे वय 18 ते 60 वर्षे वयोगटातील असावे. (iv) लाभार्थी मच्छीमाराने मासेमारीच्या हंगामात वर्षाकाठी त्यांच्या योगदानाच्या अनुषंगाने 9 महिन्यांच्या कालावधीत रु.1500/- ची बचत करावी. सदर योजनेची सुलभ व पारदर्शक अंमलबजावणी होणेसाठी राज्यांनी योग्य त्या उपापयोजना कराव्यात. लाभार्थ्याकडून एक किंवा दोन महिन्यात हिस्सा जमा करुन घेण्याचे टाळावे. (v) राज्ये / केंद्र शासित प्रदेशात अनुदानित रेशन, इंधन इत्यादी रोख किंवा कोणत्याही प्रकारात अतिरिक्त आर्थिक फायद्यांचा लाभ घेऊ शकतात. या शिवाय सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) अंतर्गत लाभार्थी देखील सदर लाभ घेण्यास पात्र आहेत. (vi) लाभार्थीच्या योग्य निवडीबाबत व लाभार्थ्यांच्या योग्य माहितीबाबत राज्य शासन जबाबदार राहील. लाभार्थ्यांच्या स्वयंपूर्ण प्रस्तावामध्ये लाभार्थ्यांच्या योग्यतेबाबतचे प्रमाणपत्र हे राज्य शासनाने निर्गमित करावे. राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये सदर घटकाकरिता अर्थसंकल्पीय वाटप उपलब्धतेबाबत सूचित करणे आवश्यक आहे. (vii) राज्याने उपरोक्त मुद्यांसह (i ते vi) मासेमारी/मासेमारी बंदी कालावधी, निवडलेले लाभार्थी व त्यांचे योगदान, मच्छिमारांचे जात प्रवर्ग (SC/ST) या बाबींची अद्ययावत नोंद ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदर माहिती हि केंद्र शासनाच्या मत्स्यवयवसाय विभागास सादर करणे आवश्यक आहे. (viii) उपरोक्त मंजूर रु.4500/-अर्थसहाय्य रक्कमेपैकी निवडलेल्या लाभार्थ्यास राज्य शासनाद्वारे दरमहा रु.1500/-याप्रमाणे DBT द्वारे अर्थसहाय्य वाटप करण्यात येईल. |
| 3 | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | (i) लाभार्थ्याचे क्रियाशीलतेचे प्रमाणपत्र.<br>(ii) लाभार्थ्याचे दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) प्रमाणपत्र. |
| 4 | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | सद्यस्थितीत ऑनलाईन सुविधा नसल्याने ऑफलाईन अर्ज स्विकारण्यात येते. |
| 5 | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | सदर योजनेत केंद्र शासन, राज्य शासन व लाभार्थी हिस्सा प्रत्येकी रु.1500/- प्रमाणे एकूण रु.4500/-इतकी रक्कम भरण्यात येते. उपरोक्त मंजूर रु.4500/- अर्थसहाय्य निवडलेल्या लाभार्थ्यास राज्य व केंद्र हिस्स्यापोटी 50% इतकी रक्कम समान दोन हप्त्यात DBT द्वारे वाटप करण्यात येते. |
| 6 | शुल्क भरण्याची पद्धत | - |

| | | |
|---|---|---|
| 7 | योजना मंजूरीसाठी लागणारा कालावधी | प्रतिवर्ष |
| 8 | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| 9 | योजनेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई व प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय तसेच संबंधीत जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), |